बीड जिल्हयातील अनुशेषांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र दुरुस्तीसाठीचे प्रलंबित देयके व अखर्चित निधी खर्च करण्यास मंजुरी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय, क्रमांकः संकिर्ण २०१७/प्र.क्र.२८२/आरोग्य-३

१० वा मजला, संकुल इमारत,
गो.ते.रुग्णालय, मुंबई-४०० ००१.
तारीख: २९ डिसेंबर, २०१७.

वाचा -

१) शासन निर्णय, वित्त विभाग,क्रमांक विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग- पहिला,

२) आरोग्य सेवा संचालनालय, मुबई यांचे पत्र क्रमांक, संआसे/ कक्ष-७/शिबीर कार्यालय/२०१७ दि. १४.१४.२०१७

प्रस्तावना -

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात बीड जिल्हयातील प्रादेशिक अनुशेषांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र दुरुस्तीच्या कामासाठी शासन निर्णय दि. १९ ऑक्टोंबर, २०१५ अन्वये रु. १२९.५० लक्ष अनुदान वितरीत करण्यात आले होते. त्यापैकी रु. ३.५० लक्ष निधी खर्च झाला आहे. असून रु. १२६.०० लक्ष इतका निधी अखर्चित आहे. सन २०१५-१६ मध्ये मंजुर करण्यात आलेला निधी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात खर्च करणे आवश्यक होते परंतू जिल्हा परिषदा व पंचायत समिती निवडणुक आचारसंहिता असल्यामुळे व जिल्हा परिषद पदाधिकाऱ्याची निवड होण्यास उशीर झाला. तसेच त्यानंतर लगेचच ग्रामपंचायतीच्या निवडणूका लागल्या या कारणांमुळे सदर निधी खर्च होऊ शकला नाही. सदर रु.१२५.८६ लक्ष निधी प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र दुरुस्तीच्या कामाचे प्रलंबित देयके अदा करणे व अखर्चित निधी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात खर्च करण्यास मंजुरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक १ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय शक्तीचा वापर करून आणि त्यामध्ये अंतर्भूत असलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून भौतिकदृष्टया पूर्ण झालेले बीड जिल्हयातील प्रादेशिक अनुशेषांतर्गत खालील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र दुरुस्तीच्या कामासाठी व प्रलंबित देयके भागविण्यासाठी रु.१२५.८६ लक्ष - (अक्षरी रु.एक कोटी पंचविस लक्ष श्याएंशी हजार मात्र) इतका निधी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात अखर्चित निधी खर्च करण्यास खालील प्रमाणे मंजुरी देण्यात येत आहे.

रु. लाखात

अ.क्र.	कामाचे नाव	मंजुर निधी
१	प्राथमिक आरोग्य केंद्र साक्षाळपिंप्रीच्या विदुयतीकरणाचे प्रलंबित देयके भागविणे.	१०.५०
२	अनुशेषांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांच्या ठिकाणी सोलर पॉवरपॅक व केव्ही सिस्टीम बसविणे.	८३.३६
३	अनुशेषांतर्गत ४ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ११ उपकेंद्रे बांधकाम/दुरुस्ती करणे.	३२.००
	एकूण	१२५.८६

२. सदर देयकावरील खर्च शिल्लक अनुदानातून मागणी क्रमांक- आर-१, मुख्यलेखाशिर्ष "२२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६- सार्वजनिक आरोग्य, ८००- इतर खर्च, प्रादेशिक असमतोल दूर करण्याकरीता योजना- स्थानिक क्षेत्रातील योजना (राज्य योजना), (०१)(०७) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ याच्या कलम १८७ अन्वये योजनांतर्गत योजनाकरिता अनुदान (२२१० ३०६५), ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. सदर निधी दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत खर्च करण्यात यावा. त्यानंतर सदर निधी शिल्लक राहील्यास शासनास जमा करण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय, वित्त विभाग,क्रमांक विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग- पहिला, उपविभाग - एक, अ.क्र.६, नियम क्रमांक - ४० अन्वये प्रशासकीय विभागाला प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार त्यात नमूद अटींच्या अधिन राहून शासन निर्णय निर्गमीत करण्यात येत आहे. ,

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१२२९१४५४४०३७१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2017.12.29 17:09:58 +05'30'

(रो.दि कदम पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र- १/ २ (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
३. सह संचालक, आरोग्य सेवा (रुग्णालये), मुंबई.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड
५. जिल्हा कोषागार अधिकारी, बीड
६. जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, बीड
७. निवडनस्ती (आरोग्य-३).